अनधिकृत बांधकामांमुळे होणाऱ्या सर्वसामान्य नागरीकांची फसवणुक रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ४६८ /नवि-२०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:-१० मार्च, २०१७.

प्रस्तावना :-

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील "लकी कंपाऊंड" येथील दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या चौकशी कामी अपर मुख्य सचिव (महसूल) यांची सदस्यीय समिती गठित करण्याचा निर्णय शासनाने नगर विकास विभागाच्या क्र.ठामपा-२११३/ प्र.क्र.१८५/नवि-२३, दि.२६.०४.२०१६ अन्वये घेतला आहे. त्यानुषंगाने गठित समितीने दिनांक ०७.०२.२०१४ रोजी शासनास अहवाल नुसार शिफारशींची अंमलबजावणी सर्व नागरी स्वराज्य संस्था व नियोजन प्राधिकरणांमध्ये लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन परिपत्रक :-

राज्यातील अनेक भागातील अनधिकृत इमारतीमध्ये नागरिक वास्तव्यास असल्याने त्या सर्व इमारती तात्काळ खाली करून तोडणे व्यवहार्य नाही. परंतु अशा इमारतींमुळे होणारी जीवितहानी विचारात घेता अनधिकृत बांधकामांविरूध्द कारवाईचा अग्रक्रम ठरविण्याच्या दृष्टीने इमारतींची वर्गवारी करण्यात यावी. ही वर्गवारी इमारतींच्या बांधकामाच्या दर्जाच्या आधारावर करण्याच्या दृष्टीने अशा अनधिकृत इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घेणे बंधनकारक राहील. तसेच स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये ज्या इमारती धोकादायक सिध्द होतील त्यातील रहिवाश्यांना बाहेर काढून त्या इमारती पाडून टाकण्यात याव्या. याची अंमलबजावणी सर्व नागरी स्थानिक संस्थांनी तसेच सर्व नियोजन प्राधिकरणांनी करण्यात यावी.

शासनाने वेळोवेळी सर्व नियोजन प्राधिकरणांना दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामावर संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येते. परंतु ज्या अनधिकृत बांधकामांविरूध्द कारवाईचे सौम्य धोरण असल्यांचा गैरफायदा घेऊन काही बांधकाम व्यवसायिक अनधिकृत बांधकामामध्ये मुद्दाम काही नागरिकांना वास्तव्यास ठेऊन त्या बांधकामाच्या पाडापाडीच्या कार्यवाहीतून बचाव करून घेतात असेही चौकशी दरम्यान दिसून आले आहे. अनधिकृत इमारतीमध्ये जरी नागरीक वास्तव्यास आले असतील तरीही त्या बांधकामाच्या पाडापाडीची कोणतीही हयगय करू नये तसेच अशा इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन अथवा पर्यायी निवाऱ्याचे उत्तरदायित्व नियोजन प्राधिकरणांना अथवा शासन घेणार नाही याची अंमलबजावणी सर्व स्थानिक प्राधिकरणामध्ये काटेकोरपणे करण्यात यावी.

२. सर्व नागरी क्षेत्रात विकास प्रस्ताव अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींची यादी, सविस्तर विकास प्रस्ताव, त्यांची मंजुरी बाबतची सर्व माहिती सर्वसामान्य नागरीकांना कळावी याकरीता वेबसाईटवर माहिती प्रसिध्द करण्यात यावी. अनधिकृत इमारतींमध्ये सदनिका न खरेदी करणेबाबत स्थानिक तसेच राज्यस्तरीय वृत्तपत्रांमध्ये सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांची यादी प्रसिध्द करून नागरीकांना जाहीर आवाहन करून याबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी स्थानिक वृत्तवाहिन्या, वृत्तपत्र आणि होर्डिंगच्या माध्यमातून नागरीकांना अनधिकृत इमारतीत घर

घेऊ नये याबाबत सर्वसामान्य नागरीकांना आवाहन करावे. वरील आदेशांचे सर्व नागरी स्थानिक संस्थांनी तसेच सर्व नियोजन प्राधिकरणांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०३१४१७०६५१३९२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Jayasingrao N Patil
Date: 2017.03.14 17:11:08 +05'30'

(ज. ना. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१) मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२) सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७) मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
८) मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
९) मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
१०) मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
११) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा (पुर्व), मुंबई
१२) व्यवस्थापकीय संचालक, सिटी ॲन्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कार्पोरेशन, नवी मुंबई
१३) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
१७) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१८) राज्यातील सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे
२०) निवडनस्ती (नवि-२०).